|| श्रीगणेशायनमः || || श्री दत्त कृपा ||




# सायं.दैनिक प्रारंभ बीड

संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे




बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ थे ■ अंक ६८ रविवार दि.२८ एप्रिल २०२४ RNI MAHMAR/2021/81481 ■ Email-prarambh2023@gmail.com पाने-४ किंमत ३ रुपये

## माझ्या गॅरंटीवर विश्वास ठेवा; तुमच्या न्याय हक्कासाठी मागे हटणार नाही

### मराठाबहूल गावांनी केला पंकजाताईंना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**ताई, तुमचं नेतृत्व सर्वमान्य आहे, तुमच्याकडे विकासाचं एक व्हिजन आहे. तुम्ही अठरापगड जातींना सोबत घेऊन काम करता, त्यामुळे तुमच्यासारख्या नेतृत्वाची आज जिल्हयाला गरज आहे, तुम्हाला प्रचंड मताधिक्याने विजयी करण्यासाठी आम्ही कठोर मेहनत घेऊ अशा शब्दांत मराठाबहूल गावांनी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासाठी आपला निर्धार व्यक्त केला. तथापि, माझ्या गॅरंटीवर विश्वास ठेवा, तुमच्या न्याय हक्कासाठी मी मागे हटणार नाही असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला.**

पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी घाटनांदूर, पट्टीवडगांव, जवळगाव, पुस, वाघाळा तसेच बर्दापूर सर्कलमधील गावांचा दौरा करून मतदारांच्या गाठीभेटी घेत थेट संवाद साधला त्यावेळी मतदारांनी त्यांच्या विजयाचा आपला निर्धार स्पष्टपणे बोलून दाखवला.

हा भाग माझ्या हक्काचा आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या राजकारणाची सुरवात इथूनच झाली, त्यांचेवर तुम्ही जीवापाड प्रेम केलं. त्यांच्यासारखं कणखर नेतृत्व तुम्ही निर्माण केलं, त्यांच्या पश्चात माझ्या पाठिमागेही तुम्ही ताकद उभी केली. आज मी लोकसभेसाठी उभी आहे. मी उमेदवार म्हणून कशी आहे?मला कशामुळे मत देणार? असा सवाल त्यांनी केला. यावर उपस्थितांनी त्यांच्या जमेच्या बाजू सांगून विकास करण्याची धमक केवळ तुमच्यामध्ये आहे असे म्हटले, यावर त्या म्हणाल्या, मला मतं देण्याची दहा कारणं असतील पण द्यायच नाही यासाठी कोणतच कारण नाहीय. निवडणूकीत विरोधक माझेवर कोणतेही आरोप करतील. त्यांचेकडे दुसरे मुद्दे नाहीत. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना ते बुध्दीभेद करून भिती घालतात, पण अशांना बळी पडू नका.मी जातीच नाही पण जिल्हयाच्या मातीचं नशीब नक्की बदलू शकते.

#### सन्मानजनक विजय हवा

मतदारसंघातील एकही गाव असे नाही, जिथे मी निधी दिला नाही. मला अजून खूप करायचयं. मुंडे साहेबांचं अधुरं स्वप्न पूर्ण करायच आहे. त्यासाठी आपल्याकडून मला सन्मानजनक विजय हवा आहे. ही संधी दवडू नका.नरेंद्र पुन्हा पंतप्रधान होणार आहेत.माझ्या गॅरंटी वर विश्वास ठेवा. कोण न्याय देऊ शकतो? हे ओळखून मला आशीर्वाद द्या असं आवाहन पंकजाताईंनी यावेळी केलं.

## विकास केला असता तर मतांची भीक मागण्याची वेळ आली नसती

### बजरंग बप्पा सोनवणेंची भाजप, पालकमंत्र्यांवर टीका



**शिरूर । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याचे पालकमंत्री, विद्यमान खासदार व त्यांच्या भाजपच्या उमेदवाराने जिल्ह्यात कोणत्याही विकासाच्या योजना राबविल्या नाहीत. रोजगार निर्मितीसाठी नवीन प्रकल्प आणले नाहीत. सिंचन आणि इतर सोयी सुविधा यांच्याकडे दुर्लक्ष केल्याने आज त्यांच्यावर मतांची भीक मागण्याची वेळ आली आहे. अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनीकरीत त्यांनी मी जिल्ह्यातील मतदारांचा स्वाभिमान जपल्यामुळे मी सन्मानाने लोकशाहीत मतांचे दान मागत असल्याचे सांगितले.**

शिरूर कासार तालुक्यात प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे बोलत होते. यावेळी युवा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष यासह इंडिया आघाडीतील मित्र पक्षाचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी मी भाजप, महायुतीच्या उमेदवारासाठी व माझ्या ताईसाठी मतदानाची भीक मागतोय. असे वक्तव्य एका सभेतून केले होते. त्या वक्तव्याचा बजरंग सोनवणे यांनी समाचार घेताना म्हटले की, जर त्यांनी बीड जिल्ह्याचा विकास केला असता रोजगार निर्मितीचे विविध प्रकल्प आणून जिल्ह्यातील बेरोजगारी कमी केली असती. तर त्यांना मतांची भीक मागण्याची वेळ आली नसती. मी मात्र स्वाभिमानाने व सन्मानाने मतदानाचे दान मागतो. हा त्यांच्यात आणि माझ्यात फरक आहे. असे सांगून स्वतःला राष्ट्रीय नेते म्हणणाऱ्या भाजप नेत्यांनी माझ्या सारख्या शेतकरी पूत्रावर बोलणे म्हणजे त्यांची उंची कमी झाल्याचे लक्षण आहे. माझी औकात व लायकी काढणे म्हणजेच हे सामान्य लोकांना हिणविण्याचा प्रकार आहे. मी १९९२ पासून स्थानिक राजकारणात प्रवेश केला. तर पालकमंत्री व त्यांच्या भगिनी या २००९ पासून राजकारणात सक्रिय झाल्या. म्हणजेच माझा राजकीय अनुभव त्यांच्यापेक्षा जास्त आहे. तसेच मराठा, धनगर व मुस्लिम आरक्षणात प्रत्येक वेळी मी सोबत राहिलो आहे. माझ्या घरात राजकीय वारसा नसेल. मी त्यांच्या सारखा श्रीमंत नसेल परंतु ▶▶ पान २ वर...

## आपले प्रश्न मांडण्यासाठी आपला माणूस दिल्लीला पाठवावा लागेल




**बीड । प्रतिनिधी**

आपले प्रश्न शासनदरबारी मांडण्यासाठी आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आपल्या प्रश्नांची जाण असलेला माणूस आपल्याला खासदार म्हणून दिल्लीला पाठवावा लागेल. त्यासाठी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडून द्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार तालुक्यातील राममोह व खालापुरी याठिकाणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ▶▶ पान २ वर...

## शिवसंग्राम लोकसभा निवडणुकीत 'तटस्थ' राहणार

### डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांची माहिती; राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत झाला निर्णय

#### विधासभा निवडणूक शिवसंग्राम लढणार - तानाजीराव शिंदे



**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत शिवसंग्राम महायुती किंवा महाविकास आघाडी कोणालाही समर्थन देणार नाही. लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहण्याचा निर्णय झाला असून, लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीसाठी स्वतंत्र बैठक घेऊन पुढील दिशा ठरवली जाईल, अशी माहिती शिवसंग्राम पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाडॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी जाहीर केले.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्राम पक्षाची भूमिका ठरवण्यासाठी राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या मंथन बैठकीचे आयोजन पुण्यातील बाळासाहेब ठाकरे सभागृहात शनिवारी करण्यात आले होते. त्यानंतर डॉ.ज्योती मेटे पत्रकारांशी बोलत होत्या. याप्रसंगी शिवसंग्रामचेप्रदेशाध्यक्ष तानाजीराव शिंदे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत आंब्रे, प्रदेश सचिव शेखर पवार, हिंदुराव जाधव, ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, खजिनदार रामनाथ जगदाळे, पुणे शहराध्यक्ष भरत लगड, कालिंदी गोडांबे, चेतन भालेकर, विनोद शिंदे, लहू ओहोळ, भरत फाटक, सागर फाटक आदी उपस्थित होते.

डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या, लोकनेते विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर प्रथमच लोकसभा निवडणूक होत आहे. बीड लोकसभेच्या अनुषंगाने भूमिका जाहीर करण्याचा निर्णय यापूर्वीही झाला ▶▶ पान २ वर...


## अवैध व चोरटी दारू विक्री करणाऱ्या आरोपीवर कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी लोकसभा सार्वत्रीक निवडणूक-२०२४ सुरळीत व शांततेत पार पडाव्यात म्हणून जास्तीत जास्त अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहेत. त्यावरून संतोष साबळे पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी आपल्या अधिपत्याखालील पथकाला तसे आदेश दिल्या वरून पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे यांचे पथक दिनांक २८/०४/२०२४ रोजी भल्या पहाटेपासूनच अवैध धंदे करणाऱ्यांची माहिती काढत पिंपळनेर हद्दीत गस्त करत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली की,बोरफडी गावातील बस स्टँड वरील हॉटेल धुळदेव च्या पाठीमागे एक इसम अवैधरित्या दारूची विक्री करत आहे,अशी बातमी मिळाले वरून बातमीचे ठिकाणी सकाळी ०९.३० वाजता एलसीबीच्या पथकाने छापा टाकला असता त्या ठिकाणी इसम नामे भिवाजी भास्कर खांडेकर रा.बोरफडी ता. जि.बीड हा देशी दारू बाबी संत्रा कंपनीच्या २१३,



(९०-) च्या बाटल्या किंमती १०,६५०/- रू.चा मुद्देमाल जवळ बाळगून त्याची चोरटी विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यास मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्याचे विरुद्ध पोलीस हवलदार राहुल शिंदे यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास कामी पोलीस ठाणे पिंपळनेर यांचे ताब्यात देण्यात आल्याने पथकाचे बोरफडी गावात व परिसरात जनतेतून कौतुक होत आहे. सदरची कामगिरी मा.श्री. नंदकुमार ▶▶ पान २ वर...



बीड: संतश्रेष्ठ श्री वामनभाऊ महाराज यांच्या काळापासून सुरू असलेला नारळी सप्ताह यावर्षी तांदळवाडी भिल्ल येथे सुरू आहे. रविवार (दि.२८) रोजी तांदळवाडी भिल्ल येथे जाऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी महंत विठ्ठल महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे उपस्थित होते.

## १३ मे रोजी मतदान करायला घराबाहेर पडा

### जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कळकळीचे आवाहन




**बीड । प्रतिनिधी**

सोमवार दिनांक १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान असून मतदान करण्यासाठी मतदार नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मतदान जनजागृतीसाठी आयोजित सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मतदारांमध्ये मतदानाचा जागर करण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. खर्च निरीक्षक सुशांत कुमार बिस्वास हे या मतदार जागृत सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. आज बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा ▶▶ पान २ वर...




## पोकलेन मशिनमुळे पारंपरिक पद्धतीने क्रेनच्या सहाय्याने विहिर खोदकाम कामाला घरघर-डॉ.ढवळे



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

काळाच्या ओघात नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध लागला पोकलेन मशिनच्या मदतीने ३-४ दिवसात ४०-५० फुटांपर्यंत विहिर खोदाई होत असल्याने मशिनला मागणी वाढली असुन त्याच वेळी पारंपारिक पद्धतीने विहीर खोदाईसाठी ३-४ महिन्याचा कालावधी लागत असे.७०-८० च्या दशकात ४० ते ५० फुट विहिर खोदाई करायची असेल तर बैलांच्या सहाय्याने शिकाळीच्या मदतीने दोन ते तीन वर्षांत काम व्हायचे.त्यानंतर २० वर्षांपासून क्रेन मथुरा आल्यानंतर हीच कामे ३-४ महिन्यांवर येऊन ठेपली असुन जानेवारी ते एप्रिल महिन्यात कामे करण्यात येतात.पारंपारीक पद्धतीने विहीर खोदाईसाठी वेळ आणि पैसाही जास्तीचा लागत असे.कमी कालावधीत आणि कमी पैशात मशिनरीने खोदाई होत असल्याने मशिनरीला ▶▶ पान २ वर...

## महेबूब भाई अपने घर शिषे के छोड कर दुसरों घर पथ्थर फेंकने कहां चले? - रमीज भाई शेख

### नेत्यांच्या पुढे पुढे करून पद मिळवता येते, पण नगरपंचायत निवडणुकीत गल्लीतला उमेदवार निवडून आणायला जनमतही लागते



**बीड । प्रतिनिधी**

महेबूब भाई तुम्हारे उपर बलात्कार, अट्रोसिटी जैसे गंभीर मामलो के केसेस चल रहे है, और चुनाव का मौसम बिगाडने के चक्कर मे, राज्य के बडे नेता पर किचड उच्छालने चले, अपने घर शिषो के छोड कर दुसरो के घर पे पथ्थर फेंकने कहां चले? अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हा कार्याध्यक्ष रमीज भाई शेख यांनी शिल्लक राष्ट्रवादीचे विकृत नेते महेबूब शेख यांना खडे बोल सुनावले आहेत.

महेबूब भाई, मोठ्या नेत्यांच्या कानांत लावलाव्या करून, त्यांच्या पुढे पुढे करून पद मिळवता येते मात्र स्वतःच्या गल्लीत नगर पंचायत निवडणुकीत आपला उमेदवार निवडून आणता येत नाही, तिथे जनमत सोबतीला असावे लागते, असा टोलाही रमीज शेख यांनी लगावला आहे.

राक्षसभुवन येथील बैठकीत बोलताना महेबूब शेख यांनी धनंजय मुंडे यांच्यावर वैयक्तीक पातळीवर टीका केली होती. 'इटका जवाब पथ्थर से मिलेगा' असे म्हणत रमीज शेख यांनी महेबूबच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे. आपल्या प्रसिद्धी पत्रकात ते पुढे म्हणतात की, महेबूब शेख याच्या पाठीमागे स्वतःचे १० कार्यकर्ते किंवा १०० मतदान ▶▶ पान २ वर...

# मासेमारी टिकणार कशी?

आता वाढवण बंदर होणार आहे. या विकासाच्या वाटचालीत मासेमारीचा व्यवसाय आणि मच्छिमार कुटुंबे यांचा कोणी विचारच करीत नाही. आज हा व्यवसाय चारी बाजूंनी संकटात सापडतो आहे. मात्र, राज्य किंवा केंद्र सरकार त्याची गंभीर दखल घेत नाही. मासेमारीला पुन्हा उभारी द्यायची तर सरकारला जाग यावी लागेल.

भारत आर्थिक महासत्ता बनत आहे. आपली अर्थव्यवस्था २०२७ पर्यंत जगात तिसरी होईल. ही प्रगती सर्वंकष असावी, या अपेक्षेला पूरक असे प्रयत्न सरकारचे असतात. अशा पार्श्वभूमीवर ज्यांचा मासेमारी हा पिढीजात व्यवसाय आहे, अशा पालघर जिल्ह्यातील कोळी समाजाचे भविष्य काय आहे, याची चर्चा करण्याचा हा प्रयत्न. सामान्य लोकांच्या मनात कोळी समाजाच्या आर्थिक स्थितीबद्दल अनेक गैरसमज असतात. सण-समारंभात सोन्याच्या दागिन्यांनी नटलेल्या कोळी महिला, बाजारात वाढलेले माशांचे भाव हे सर्व पाहून कोळ्यांचा धंदा तेजीत आहे, असे काहींना वाटते. पण वास्तव यापेक्षा विपरीत आहे. पालघर जिल्ह्यातील मच्छिमार समाज, ज्यामध्ये मांगेला, वैती, आगरी, मितना अशा अनेक जातींचे लोक येतात, यांची परिस्थिती शोचनीय आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबईच्या शेजारी असलेला पालघर जिल्हा सरकार दरबारी आदिवासी जिल्हा म्हणून नोंदवला गेला आहे. पालघरच्या पश्चिम भागात किनारपट्टी भागात मच्छिमार समाज बहुसंख्येने आहे. पारंपरिक पद्धतीने येथील खाड्या आणि जवळच्या समुद्रात मासेमारी केली जाते. तसेच खोल समुद्रात २५०० पेक्षा जास्त यांत्रिक नौका आहेत. मासेमारी आणि त्यावर आधारीत इतर उद्योग अशी एक मोठी अर्थव्यवस्था (इकोसिस्टम) येथे कित्येक शतके आहे. गेल्या काही वर्षात पालघर जिल्ह्यातील किनारपट्टी भागात बोईसर, पालघर, डहाणू, किंवा खाली दक्षिणेत वसई-विरार येथे औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या. कारखाने सुरू झाले. या औद्योगिक वसाहतींमधून सोडले जाणारे रसायनमिश्रित विषारी पाणी, नागरी वस्त्यांमधून कचरा आणि सांडपाण्याचा खाड्यांमध्ये होणारा निचरा यामुळे येथील खाड्या प्रदूषित झाल्या. किनारपट्टी भागातून मासे गायब झाले. पूर्वी यांवर अनेक कुटुंबे जगत. पण आता मासे मिळेनासे झाल्याने या लोकांचे जीवन खडतर झाले. खोल समुद्रात मासेमारी होते, पण जास्तीच्या हव्यासापोटी सगळे नियम बाजूला ठेवून बेबंद मासेमारी होते आणि समुद्र खरवडून निघतो. आज खोल समुद्रातही मासे मिळणे कठीण झाले आहे. आठ-दहा दिवस खोल समुद्रात वणवण फिरल्यानंतरही मासे मिळतील याची खात्री नाही. शेकडो लिटर डिझेल जाळून जेव्हा बोट रिकामी परत येते तेव्हा हजारोंचे नुकसान होते. त्यांवर अवलंबून असणाऱ्या सर्व लोकांसमोर अस्तित्वाचा प्रश्न आहे.

मासे मिळण्याचे प्रमाण घटल्याने धंद्यात नुकसान होते. ८०-८५ टक्के मच्छिमार हे कर्जाच्या ओझ्याखाली दबतात. १०-१२ टक्के कसे तरी खर्च वसूल करतात आणि ५ टक्क्यांहून कमी मच्छिमार हे थोडा-अधिक नफा मिळवतात. धंद्यासाठी कर्ज मिळण्याची योग्य सोय नसल्याने अधिक व्याजाचे कर्ज खासगी सावकाराकडून घ्यावे लागते. दागिने गहाण पडतात. मच्छिमार समाजाची सर्वांत मोठी अडचण म्हणजे त्यांच्या वडिलोपर्जित वहिवाटीच्या जागा त्यांच्या नावावर नसतात. त्यामुळे बँकांकडे कर्जासाठी जावे तर तारण ठेवण्यास काही नसते, अशी विचित्र अडचण आहे. कोळी समाज हा झुंजार आहे. अपयशाने खचत नाही. त्यामुळे या समाजात आत्महत्या करण्याचे प्रकार घडत नाहीत. पण यामुळे कोळ्यांच्या अडचणीकडे समाज, सरकार दुर्लक्ष करते. पालघरमधील मच्छिमार समाज असाच दुर्लक्षित राहिला आहे. त्यात आमदार, खासदार हे आरक्षित असल्याने या समाजातील कार्यकर्त्यांना राजकीय भविष्य नसते. चांगले राजकीय नेतृत्व नसल्याने येथील मच्छिमार समाजाच्या प्रश्नांना योग्य अधिष्ठान मिळत नाही.

पालघर जिल्ह्यात (पूर्वीचा ठाणे जिल्हा) तारापूर येथे साठच्या दशकात पहिली अणुभट्टी आली तर सत्तरच्या दशकात एमआयडीसी आली. पुढे याचा विस्तार झाला. ऐंशीच्या दशकात डहाणू येथे औष्णिक विद्युत केंद्र आले. या प्रकल्पांमुळे ग्रस्त लोकांचे पुनर्वसन यतातथाच झाले. आजही अनेक लोक यातून नीट सावरलेले नाहीत. पण यामुळे मच्छिमार समाजाचे सर्वांत जास्त नुकसान झाले. प्रदूषणामुळे किनाऱ्यालगत मासेमारी जवळ जवळ संपली आहे. देशाच्या प्रगतीसाठी हे प्रकल्प आणले जात असताना एका मोठ्या समाजासमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा राहू शकतो याचा विचार झाला किंवा त्यातून मार्ग काढला गेला; असे झाले नाही. मच्छिमार समाज आपल्या अडचणी मांडू शकला नाही, त्यांना खिजगणतीतही पकडले गेले नाही. आज याच भागात वाढवण बंदर उभारण्याचा निर्णय झाला. पण त्या निर्णयप्रक्रियेत मच्छिमार समाज कुठेच नाही. बंदरामुळ मासेमारी क्षेत्र संकुचित होणार असे दिसते. एखाद्या प्रकल्पात शेतकऱ्याची जमीन गेल्यास त्याला ५-६ पटीत मोबदला मिळतो, त्यातून त्याचे पुनर्वसन होऊ शकते. पण कोळ्यांचे जीवन ज्यावर चालते; तो समुद्र त्यांच्याकडून काढून घेतला तर त्याने मासेमारी कुठे करायची? शिवाय वहिवाटीची जागा नावावर नसल्याने विस्थापित व्हावे लागले तर आर्थिक न मिळण्याची भीती. या भागातील हजारो कुटुंबांचे जीवन चालवणारी मोठी इकोसिस्टम उद्ध्वस्त होण्याचा धोका आहे. सरकार या विषयावर खुल्या दिलाने चर्चा करत नाही, माहिती देत नाही, अशी लोकांची भावना झाली आहे. यामुळे कित्येक वर्षे मूकपणे सहन करणार मच्छिमार समाज आज संतापलेला आहे. आम्ही येथील मच्छिमारी बंद होऊ देणार नाही, येथे मासेमारीचे आधुनिक बंदर उभे करून देऊ, असे जेव्हा सरकार म्हणते तेव्हा ते नक्की काय आहे, हे लोकांना समजावून सांगावे लागेल. पण त्या आधी आता मच्छिमारीवर जे संकट आहे; त्यावर उपाय करून लोकांचा विश्वास जिंकला गेला पाहिजे. हल्ली वर्षभर मासेमारी चालते. फक्त जून आणि जुलै हे दोन महिने ती बंद असते. माशांच्या पुनरुत्पादनासाठा हा काळ पुरेसा नाही. दोन महिन्यांऐवजी चार महिन्यांसाठी दोन टप्प्यात मासेमारीवर बंदी घालता येईल का, यावर विचार व्हावा. ती बंदी कशी असावी, माशांचे पुनरुत्पादन कोणत्या काळात जास्त होते, यासंबंधी तज्ज्ञ मंडळींनी संशोधन करून ते ठरवता येईल. अधिक दोन महिने बोटी बंद ठेवायच्या तर त्यांवर अवलंबून असणाऱ्यांचे नुकसान होईल तर ते सरकारने अनुदान देऊन भरून काढावे. हा पैसा कुठून येणार? तर बोटींना डिझेलवरील कराचा परतावा राज्य सरकार देते. बोटी मासेमारीला गेल्या नाहीत तर तो पैसा वाचेल. त्यामध्येच योग्य भर घालून प्रत्येक बोटीला अनुदान देता येईल. पालघर जिल्ह्यात अडीच हजार बोटी आहेत. त्या सर्वांना ५० हजार ते एक लाख रुपये, (बोटीवरच्या खलाशांच्या प्रमाणात वगैरे) इतके मासिक अनुदान दिले तरी दोन महिन्यासाठी २५-३० कोटीच खर्च होतील. संपूर्ण कोकण किनारपट्टीतील बोटींची संख्या मोजली तरी ती रक्कम फार मोठी नसेल. शेतकऱ्यांना दरवर्षी स्वस्त दरात वीज, वेळोवेळी कर्जमाफी, अनुदान यांवर हजारो कोटी खर्च होत असताना मच्छिमार समाजासाठी सरकार नक्की हा खर्च करू शकते. मासेमारीवरील अधिक काळ बंदी मच्छिमार समाजाचे सहकार्य मिळेल. यामुळे बाकी आठ महिन्यात मासेमारी चांगली होऊ शकेल. हल्ली मोठ्या ट्रॉलर्स मासेमारी करताना सर्व नियम टांगून ठेवतात. जाळ्यांच्या आसाची मापे मोठी केल्यास माशांचा पिल्ले मारली जाणार नाहीत. केंद्र सरकार यावर कायदा आणणार आहे, असे ऐकिवात आहे. त्यावर लवकरात लवकर निर्णय होऊन तो अमलात आणला गेला पाहिजे . शिवाय राज्याच्या सीमेबाहेर, म्हणजे समुद्रात १० नॉटिकल मैलांच्या पुढे इतर राज्यातील मोठ्या बोटी येऊन मासेमारी करण्याचे प्रकार चालतात. राज्यांची सीमा वाढवून तो समुद्र त्या त्या राज्यातील मच्छिमारांसाठी राखून ठेवला गेला पाहिजे.

# कोकणचा राजा झिम्मा खेळतो !

थंडीनं काढता पाय घेतला की, आंब्याच्या चर्चा रंगू लागतात. आमराईत घमघमणाऱ्या मोहरापासूनच आपल्या आगमनाची वर्दी देणारा आंबा हिरव्या कैरीपासून ते गुलाबी केशरी छटेपर्यंत जसजसा रंग बदलतो, तसतसा खवय्यांचा संयम सुटू लागतो. बाजारात आलेल्या पहिल्या पेटीची बातमी झळकली की अस्सल आम्रप्रेमी बाजारात घिरट्या घालू लागतात. हापूसचं 'स्वाद वर्चस्व' मान्य करत त्याला शरण जाणारे बहुसंख्य असले तरी, स्थानिक वाणांच्या प्रेमातले 'देशीवादी'ही कमी नसतात. आंबा उत्पादनांची गणितं हवामानाच्या लहरीवर असतात. झाडावरून ग्राहकाच्या घरात पोहोचेपर्यंत अनेकांच्या आयुष्याला स्पर्श करणाऱ्या आंब्यावर अनेकांचं घर चालतं. यंदाच्या आंब्याच्या मोसमाचा हा रसाळ वेध... राजापूरचे गजानन शेट्ये गेली ३० वर्षे हापूस आंबा उत्पादन क्षेत्रात आहेत. नैसर्गिक आपत्ती, हवामान बदल, करोना काळ अशा अनेक संकटांमध्ये ते खंबीरपणे पाय रोवून उभे आहेत. 'मिनिस्टर' या नावाने त्यांनी आंब्याचा ब्रॅण्ड विकसित केला आहे. मुंबई, पुण्यापासून ते राजकोट, अहमदाबाद, सुरत अशा अनेक शहरांमध्ये या ब्रॅण्डची लोकप्रियता आहे. नैसर्गिक पद्धतीने घेतले जाणारे उत्पादन आणि त्याला विश्वासार्हता, प्रभावी मार्केटिंगची जोड देत गजानन यांनी महेश, मंदार या दोन भावांच्या मदतीने या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. पण कोकणातून अशा यशोगाथांचे प्रमाण वर्षागणिककमी होत असून हापूसच्या अवतीभवती समस्यांची कीड वाढू लागली आहे. हापूसच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक, जीआय टॅगिंगचा सध्या तरी फसलेला प्रयोग, आंबा उत्पादक शेतकऱ्यांकडे सरकारचे दुर्लक्ष, विमा कंपन्यांच्या जाचक अटी अशा कारणांनी कोकणसाठी वरदान ठरलेला हापूस आता शेतकऱ्यांच्या विवंचनेचे कारण बनू लागला आहे. कल्टार प्रयोगातून मोठ्या प्रमाणात पीक घेण्याचा हव्यास, रासायनिक खतांचा अतिवापर अशा कारणांनीही शेतकरी पायावर धोंडा मारून घेत असल्याचे सत्यही नाकारून चालणार नाही. कोकणातील शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी धडपणाऱ्या ग्लोबल कोकण, कोकण भूमी प्रतिष्ठान या संस्थांच्या अहवालानुसार कोकणात अंदाजे सहा लाख एकर जागेवर हापूस आंब्याच्या बागा आहेत. कोकणातील दोन लाख कुटुंबांची अर्थव्यवस्था आंब्यावर अवलंबून आहे. दरवर्षी ४० ते ५० लाख पेटी आंबा मुंबईतील बाजारपेठांमध्ये येतो. तितकाच तो खासगी पद्धतीने विकला जातो. तब्बल तीन ते चार हजार कोटींची उलाढाल यात होते. तरीही ग्राहकांना परवडणाऱ्या दरात आंबे उपलब्ध नसणे, हापूसच्या नावाखाली होणारी



फसवणूक हे प्रकार एकीकडे वाढतच आहेत, तर दुसरीकडे शेतकरीही योग्य मोबदला मिळत नसल्याची तक्रार करतात. या विरोधाभासासाठी ग्राहक आणि शेतकरी यांच्यामध्ये असलेला दलाल जबाबदार असल्याचा आरोप ग्लोबल कोकणचे संस्थापक संजय यादवराव करतात. आंबा कोकणातून येत असला तरी त्याचे भाव मुंबईतील दलाल ठरवतात. दुसरीकडे आंब्याचे मार्केटिंग असो वा उत्पादन, यासाठी राज्य सरकारकडून कोणतेही सहकार्य मिळत नाही. गेल्या काही वर्षांत नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत. नुकसानीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत, पण राज्य आंबा उत्पादक शेतकरी असंघटीत असल्याचा फायदा घेत त्यांच्या तोंडाला केवळ आश्वासनांची पाने पुसत असल्याचा आरोप यादवराव करतात. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना कृषी, पणन मंडळाच्या माध्यमातून राज्यभरात विक्रीसाठी जागा उपलब्ध करून दिल्यास ग्राहकांना योग्य दरात चांगला आंबा उपलब्ध होईलच, शिवाय आर्थिक उलाढालही दुप्पट होण्याचा विश्वास ते व्यक्त करतात.

गुणवत्ता आणि उत्तम चव यामुळे कोकणातील हापूसला जीआय टॅगचा मान मिळाला. यामुळे ग्राहकांची फसवणूक थांबून खऱ्या हापूसची चव चाखायला मिळेल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र तसे घडत नसल्यामुळे कोकणातील शेतकरीही हताश आहे. देशभरातून येणारा आंबा हापूस म्हणून विकला जात असूनही कारवाईसाठी कोणाचाच अंकुश नाही. आंब्यापासून बनवलेली उत्पादने विकणाऱ्या कंपन्यांनीही जीआय टॅगिंगचे मापदंड पाळलेले नाहीत. हा टॅग केवळ नावापुरता असून त्याचा प्रत्यक्ष कोणताच फायदा मिळत नसल्याकडे दापोली, देवगड तालुका मँगो ग्रोवर्स को ऑपरेटिव्ह सोसायटीज लि. चे अध्यक्ष अजित गोगटे यांनी लक्ष वेधले. सध्या काही आंबा उत्पादक शेतकरी क्यूआर कोड तंत्रज्ञानाचा वापर करून आपला आंबा हा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण जीआय टॅगच्या बाबतीत लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची गरज असल्याचे हा टॅग मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्यांपैकी एक असलेल्या कोकण हापूस आंबा उत्पादन आणि विक्री को ऑपरेटिव्ह सोसायटीनेही व्यक्त केला आहे.

कर्नाटक हापूसचे आव्हान कोकणातील हापूससारखाच दिसणाऱ्या कर्नाटक हापूस आंब्याने सध्याने सध्या मुंबईतील बाजारपेठ मोठ्या प्रमाणात काबीज केली आहे. कोकणातील हापूस ६०० रुपये डझन दराने विकला जात असेल तर कर्नाटकचा आंबा ३०० रुपये दराने विकला जात आहे. त्यामुळे ग्राहकांची पसंतीही या आंब्यांना मिळत आहे, कोकणच्या नावाने हा आंबा विकला जात असून त्यामुळे चव आणि दर्जा यात फरक असलेला हा आंबा कर्नाटकच्या नावाने विकला जावा अशी मागणी जोर धरू लागली आहे. दक्षिण आफ्रिकेतील मलावीपासून ते मानकुराद, राजापुरी, बदामी, लंगडा, आम्रपाली, बंगनपल्ली अशा इतर राज्यांतील आंब्यांनी हापूससमोर आव्हान उभे केले आहे. करोना काळात शेतकऱ्यांचा आंबा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी व पणन मंडळाने वेबसाइट सुरू केली होती, पण सध्या काही आंबा उत्पादक सोडले तर राज्य सरकारच्या माध्यमातून ग्राहक आणि उत्पादक यांच्यात थेट संवादाचे कोणतेच प्रयत्न होताना दिसत नाहीत. काही शेतकऱ्यांनी एक, दीड डझनच्या रूपातही आंब्याच्या पेट्या ऑनलाइन उपलब्ध करून दिल्याने त्याला प्रतिसादही मिळत आहे, पण ऑनलाइन आंबा विक्रीसाठी प्रभावी व्यासपीठ निर्माण होण्याची गरज आहे. एपीएमसीच्या माध्यमातून मुंबईतील सर्वाधिक आंबा विक्री होत असली तरी त्यापलीकडे थेट मुंबईतील विविध विभागांमध्ये आंबा विक्री केंद्रांचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. गिरगाव, शिवाजी पार्क, विलेपार्ले, ठाणे, डोंबिवली इथे तीन महिन्यांसाठी गाळे भाड्याने घेऊन तेथून थेट ग्राहकांपर्यंत आंबा पोहोचवणारे अनेक आंबा उत्पादक आहेत. यातील अनेकांचे तर ३० ते ४० वर्षांहून अधिक काळ ग्राहकांना जोडून ठेवले आहे. एपीएमसीऐवजी कोकणातून मुंबईत थेट आंबा विक्री करणाऱ्यांचे प्रमाण सध्या १५ टक्के आहे. आंबा उत्पादकांना तीन महिन्यांसाठी मुंबईतील स्वस्त दरात सरकारने जागा उपलब्ध करून दिल्या तर उत्तम दर्जाचा आंबा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणे अधिक सोपे होईल. हापूसच्या नावाखाली जी फसवणूक सुरू आहे, त्यालाही आळा घालणे सोपे होईल, याकडे मुंबईतील आंबा विक्रेते विशाल सामंत यांनी लक्ष वेधले. पायरी, केशरही स्पर्धेत कोकणातील सर्वाधिक रसाळ आंबा अशी ओळख असलेला पायरीच्या चाहत्यांची संख्या पण खूप मोठी आहे. पण हापूसच्या लागवडीत पायरीकडे दुर्लक्ष झाल्याने या आंब्याचे प्रमाण हे दिवसेंदिवस कमी होऊ लागले आहे. सध्या काही ठिकाणी तर हापूसहून अधिक दरात पायरी आंबा विकला जात आहे. दुसरीकडे मराठवाड्यातून मे महिन्यात दाखल होणारा केशर आंबाही यंदा एप्रिल मध्यावर मुंबईत दाखल झाला आहे. सध्या १८० ते १९० रु किलोने केशर आंबा उपलब्ध आहे. मराठवाड्यापाठोपाठ पुढील काही दिवसांमध्ये गुजरातचा केशरही मुंबईत दाखल होईल. त्यामुळे हापूससोबतच १० ते १२ प्रकारातील आंबे ग्राहकांसाठी उपलब्ध होतील

पान १/४ वरून

## बीडमध्ये टपाली मतदान

सुविधा केंद्र- दि. १०, ११ व १२ मे २०२४ रोजी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० पर्यंत टपाली मतदानाची वेळ ठरविण्यात आली आहे.

मतदान केंद्र ठिकाणाचा पत्ता- जिल्हाधिकारी कार्यालय, ग्रा.पं., जि.प. निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक १८

टपाली मतदानासाठी केंद्रावरील केंद्रप्रमुख ना. तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, एम. व्ही. काळे ,मतदान अधिकारी-१ क.प्र.अधिकारी, पंचायत विभाग, जि. प., बीड, मनोज किंबहने, मतदान अधिकारी २ प्रा.प्र. जि. प.प्र शाळा, शिवाजीनगर केंद्र अजीजपुरा, एस.बी. शेंडगे, मतदान अधिकारी ३, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय, एस. बी. बांगर यांची नियुक्ती जिल्हा निवडणुक अधिकारी यांनी केली आहे.

## बजरंग बप्पा निवडून यावे

चळवळीत सहभागी असलेला तरुण सिद्धेश्वर हिंगे यांनी भाजपच्या उमेदवाराचा दारूण पराभव व्हावा आणि मराठा आरक्षणाचे समर्थक राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे प्रचंड मताने निवडून यावे म्हणून त्यांनी १२ गाड्या ओढण्याचा नवस केला होता. त्या नुसार सिद्धेश्वर हिंगे यांनी दि. २३ एप्रिल रोजी हनुमान जयंतीच्या दिवशी त्यांनी १२ गाड्या ओढवून आपला नवस पूर्ण केला. याची माहिती गेवराई तालुक्याचे शिवसेनेचे नेते माजी मंत्री लोकनेते बदाम आबा पंडित यांनी देतात बजरंग सोनवणे हे बदामराव आबा पंडित, पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, युध्दजित पंडित, महेश बेद्रे, अमोल करांडे, आबा दाभाडे, उद्योजक पानसंबळ यांच्यासह त्यांनी रानमळा येथे जावून सिद्धेश्वर हिंगे यांची भेट घेतली आणि त्यांचा सत्कार केला.

## डॉ.आंबेडकर जयंती महोत्सवास

जयंती महोत्सव कार्यक्रमास भेटी दिल्या व मतदारांशी संवाद साधला यावेळी गावागावात हिंगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले .प्रत्येक गावातून सर्व जाती धर्मातील लोकांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या अशोक हिंगे पाटलांना संसदेत पाठवायचेच असा निर्धार मतदारांनी बोलून दाखविला यावेळी प्रत्येक ठिकाणी हजारो मतदारांची उपस्थिती दिसून आली.

## राज्यात सरकार आल्यास ऊसतोड

शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, माजी आमदार बदामराव पंडित, पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप शिरसागर, युवा नेते युद्धजीत पंडित, राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे, उद्योजक पानसंबळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी भाजप सरकार व त्यांच्या नेत्यांचा धडा शिकवायचा असेल तर या लोकसभेच्या निवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव करणे आवश्यक आहे. बंजारा समाज हा सेवालाल महाराज आणि स्व. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या विचाराचे पाईक असून ते आमच्या समाजाचे आदर्श आहेत असे सांगितले.

मेळाव्यास महानायक ग्रुपचे भगवान राठोड आणि त्यांचे संस्थापक भगवान राठोड आणि त्यांचे सहकारी जायकोबा राठोड, शरद पवार, संजय पवार सुनील चव्हाण यांच्यासह गेवराई आणि माजलगाव तालुक्यातील बंजारा बांधव व तरुण उपस्थित होते. दरम्यान, बंजारा समाजाचा बजरंग बप्पा सोनवणे यांना पाठिंबा दिला असल्याने भाजप आणि त्यांच्या उमेदवाराच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

बंजारा समाजाचे आरक्षण हिसकवून घेणाऱ्यांना धडा शिकवा

आमचा समाज मागास असताना भाजप नेत्यांनी सत्तेचा गैरवापर करून आमच्या जात प्रवर्गात इतर समाजाचा समावेश करून आमचे अधिकार आणि हक्क हिरावले आहेत. त्यामुळे आमच्या समाजावर अन्याय झालेला असून बंजारा समाज मागे पडत असल्याचे दिसत आहे. हा समाज ऊसतोड मजूर असून स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रतिनिधित्व मिळत नाही. तसेच बंजारा समाज ऊसतोड करणारा आहे. तरी देखील ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष इतर समाजाचा करून अन्याय केला जात आहे. अन्यायाचा बदला घेण्यासाठी आता भाजपची सत्ता उलथून टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना बंजारा समाजाचा पाठींबा देण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. असे महानायक ग्रुपचे संस्थापक भगवान राठोड यांनी सांगितले.

## मनुष्याने अहंकार नष्ट करावा

मनुष्याने अहंकार नष्ट करावा म्हणजे सद्गुणी विचार अधिक बलवान होतात. जसं कर्म असतं तसं फळ मिळतं असतं.मनाला सुमन बनवा म्हणजे भगवंत त्यात वास करेल. जीवन क्षणभंगुर आहे, हे प्रत्येकाला ज्ञात होऊनही हाव सुटत नाही. श्रीमद भागवत गीता श्रवण केल्यामुळे मानसिक शांती देत असून मनाला सर्वोच्च शक्तीशी जोडण्यासाठी हे उत्तम माध्यम आहे. आपण शांत आणि चांगले जीवन कसे जगू शकतो याचा धडाही भागवत गीतेत आहे. भागवत गीतेत जीवन जगण्याची अनेक सूत्रे आहेत.

भगवद्गीतेची सूत्रे आपल्याला आपल्या कार्यात कार्यक्षमतेने, शांत मनाने आणि दृढ मनाने जीवन कसे जगावे हे सांगते. माणसाने आपले मनोबल कधीही ढासळू देऊ नये. उदास मनामुळे शरीरही कोलमडते. गीता मनोबल वाढवते. महापुरुषांचे चरित्र समोर ठेवून मनोबल वाढवा आणि चंचल मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सतत सराव करायला शिकवा भगवंताच्या नावात तल्लीन होणे हेच संताचे स्थान आहे. राजाची भुमिका बजावल्या नंतर मानवाला राजा ही बनता येते असे यावेळी महाराजांनी आपल्या वाणीतून भाविकांना मंत्रमुग्ध केले. तसेच सप्ताहात मंगळवार २३ एप्रिल रोजी सकाळी ह.भ.प गुरुवर्य तुकाराम महाराज शिंदे यांच्या हस्ते कलशाची स्थापना करण्यात आली. मंगळवार ३० एप्रिल पर्यंत चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ६ ते ७ वाजता पर्यंत काकडा, दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत श्रीमद भागवत कथा, सायंकाळी ७ ते ८ वाजेपर्यंत ज्ञानेश्वर महाराजांच्या हरिपाठात तरुण, महिला, ज्येष्ठ, महिला यांनी उत्कृष्ठ सहभाग दर्शवित आहे. मंगळवार ३० एप्रिल रोजी सकाळी ११ ते १ यावेळेत श्री. ह.भ.प. गुरूवर्य तुकाराम महाराज शिंदे अध्यक्ष कोकणस्थ मराठा धर्मशाळा आळंदी दे. यांचे अमृतमूल्य काल्याचे किर्तन होईल .त्यानंतर महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात येईल. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन ह.भ.प डॉ. सहदेव महाराज शास्त्री आणि मांडवजाळी गावकऱ्यांनी केले आहे.

## बीड मतदारसंघातील बुथप्रमुखांना

कधीच जातीवादाला थारा दिलेला नाही. त्यामुळे विरोधकांकडून सुरु असलेल्या बुध्दीभेदाच्या प्रचाराला बळी पडू नका, प्रत्येक घटकांपर्यंत जावून त्यांना जिल्ह्याच्या विकासाची भूमिका तसेच देशपातळीवर पक्षाची भूमिका विषद करा असे सांगत पंकजाताई म्हणाल्या, बीड मतदार संघात आपल्या सर्वांकडून खूप सकारात्मक कामाची अपेक्षा मला आहे. गावागावात आपल्याला अधिकचे मतदान कसे मिळेल याकडे लक्ष द्या व त्याप्रमाणे काम करा. लोकांमध्ये जा,त्यांना समजावून सांगा असे आवाहन पंकजाताईंनी केले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी बीड मतदार संघातील गावांचा बूथनिहाय बूथ प्रमुखांकडून आढावा घेतला. काही चुकलं असेल तर तुम्ही दुरुस्त करा, पण मनापासून कामाला लागा, विजय आपलाच आहे असा विश्वासही त्यांनी बुथप्रमुख,कार्यकर्त्यांना दिला. यावेळी बीड मतदारसंघातील बुथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेचा

सुरेश पवार, बाळराजे राठोड, अनिल महाराज सेवाधाम, सुंदरसिंग महाराज, पवन चव्हान स्ततम,पवार आदींसह असंख्य बंजारा कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. गोरबंजारा समाजाच्या पाठिंब्यासाठी गोरबंजारा समाजाकडून गोरबोलीला आठव्या सूचित आणण्यासाठी केंद्रीय स्तरावर पुढाकार घ्यावा. बंजारा समाजाला गोरबोली भाषेचा दर्जा मिळून द्यावा. गोरबंजारा समाजाचे नेते, कार्यकर्ते यांना राजसत्तेमध्ये सहभागी करून संधी द्यावी या प्रमुख मागण्या आपण पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्न करू असे पंकजाताईंनी यावेळी म्हटले.बीड (सरकार): भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना राष्ट्रीय बंजारा परिषदेने जाहीर पाठिंबा दिला आहे. जिल्ह्यातून पंकजाताईंना प्रचंड मताधिक्य देण्यासाठी परिषदेच्या माध्यमातून बंजारा समाजाच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागण्याचा निर्धार केला आहे. बंजारा परिषदेचे राष्ट्रीय महासचिव ॲड. पंडित राठोड व प्रदेशाध्यक्ष जयकुमार राठोड यांनी गुरूवारी परळी येथे पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले.

## आरोग्यदूतच्या आरोग्य

हा या संवाद यात्रेचा मुख्य उद्देश आहे, असे राऊत यांनी सांगितले. दुर्धर आजाराने ग्रस्त रूग्णांना गेल्या १ वर्ष ९ महिन्यात एकूण २३० कोटींपेक्षा अधिक अर्थसहाय्य गरीब, गरजू रुग्णांना वितरीत केले आहे. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रूग्ण हा मदतीविना वंचित राहू नये याची दक्षता घेण्याचे आदेशच मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी दिले आहेत. त्यानुषंगाने व्यापक जनजागृती व्हावी यासाठी आरोग्यदूत फाऊंडेशनने ही यात्रा काढली आहे. यात्रेचे संपूर्ण विदर्भ आणि मराठवाडा भागात स्वागत झाले.

आरोग्य संवाद यात्रा प्रभावी ठरतेय : मंगेश चिवटे

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळविण्यासाठी गरजुंनी थेट अर्ज करून मदत मिळवावी. योजनेची व्यापक जनजागृती व्हावी, यासाठी ही यात्रा प्रभावी ठरत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय अधिक माहितीसाठी राज्यातील नागरिकांनी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळवावा आणि स्वतः अर्ज करा, असे आवाहन या संवाद यात्रेत केले जाते, अशी माहिती मुख्यमंत्री महोदय यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी दिली.

यात्रेत मान्यवरांचा सहभाग

विदर्भ, मराठवाड्यातील लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार रामटेक- राजू पारवे, नागपूर- नितीन गडकरी, चंद्रपूर- सुधीर मुनगंटीवार, यवतमाळ-वाशिम - राजश्रीताई हेमंत पाटील, हिंगोली- बाबुराव कदम कोहळीकर, परभणी- महादेव जानकर, छत्रपती संभाजीनगर- संदीपान भुमरे, शिर्डी- सदाशिव लोखंडे, बीड- पंकजाताई मुंडे यांनी आपापल्या मतदारसंघात आरोग्य संवाद यात्रेचे स्वागत केले. आरोग्य संवाद यात्रेत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेशजी चिवटे, शिवसेना वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे राज्य प्रमुख रामहरी राऊत, शासनाच्या आदर्श ग्राम समितीचे सदस्य पुरुषोत्तम वायाळ, आरोग्यदूत फाऊंडेशनचे अध्यक्ष युवराज काकडे, रूग्णसेवक बाजीराव चव्हाण, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष ठाणे जिल्हाप्रमुख निखिल बुडजडे, आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने, सहसंपादक भगीरथ तोडकरी, वैद्यकीय सहाय्यक नितीन हिलाल यांचा सहभाग आहे.

## महेबूब भाई अपने घर शिषे

सुद्धा नाही, अनेकांची लूट, फसवणूक असे आरोप आणि बलात्कार, अट्रोसिटी सारखे केसेस त्यांच्यावर सुरू आहेत. मात्र आपली उंची किती याचे भान विसरून राज्यात आपल्या कर्तबगारीने प्रसिद्ध असलेल्या आमच्या नेत्यांवर वैयक्तिक टीका करताना महेबूब यांनी आपली पातळी व उंची तपासावी, अन्यथा चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असेही रमीजभाई शेख यांनी म्हटले आहे.

## आपले प्रश्न मांडण्यासाठी आपला

(शरदचंद्र पवार) व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेतली. यावेळी, आपल्या प्रश्नांची आणि समस्यांची जाण असलेला माणूस आपल्याला खासदार म्हणून दिल्लीत पाठवावा लागेल. आपला खासदार हा आपले प्रश्न जाणणारा, तो शासनदरबारी मांडणारा आणि त्याचा पाठपुरावा करणारा असला पाहिजे. आणि असा चेहरा आपल्याकडे बजरंग सोनवणे यांच्या रूपाने आहे. त्यामुळे त्यांना मतदानरूपी आशिर्वाद देऊन दिल्लीला पाठवण्याचा निर्धार करू. असे आवाहन यावेळी उपस्थितांना आ.क्षीरसागर यांनी केले. या सभांसाठी स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवसंग्राम लोकसभा निवडणुकीत

होता. त्यामुळे तटस्थतेचा निर्णय घ्यायला उशीर झाला असे नाही. आता सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून लोकसभेसाठी तटस्थ राहण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.राजकारणात अनुषंगिक भूमिका असतात. योग्यवेळी योग्य निर्णय घेण्यालाच राजकारणात महत्व असते. आमचीही भूमिका अशीच होती. लोकसभा निवडणूक लढवण्याबाबत बीडच्या जनतेची इच्छा होती. त्यामुळे आमच्या संघटना पातळीवर हा विचार झाला होता.जनतेचा सन्मान करण्याच्या अनुषंगाने बीडमध्ये लोकसभा निवडणूक लढवणार नाही अशी भूमिका जाहीर केली होती.

तानाजीराव शिंदे म्हणाले, लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर आम्ही पुन्हा राज्य कार्यकारिणीची बैठक घेऊ. यानंतर विधानसभेची तयारी केली जाईल. शिवसंग्राम विधानसभेच्या १२ जागा लढवणार आहे, हे आम्ही याआधीही जाहीर केले आहे. विधानसभेच्या दृष्टीने जी काही रणनीती आखावी लागेल, यासाठी ज्या पक्षांची मदत घ्यावी लागेल किंवा ज्यांच्यासोबत युती करावी लागेल याचाही विचार योग्यवेळी केला जाईल.आम्ही महायुतीमध्ये होतो, हा भुतकाळ आहे. नाराजीचा प्रश्न नसून सगळ्यांशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे. आम्ही मतदान करणार पण कोणत्याही पक्षाला पाठिंबा देणार नाही.

## पोकलेन मशिनमुळे

जास्त मागणी असल्याने क्रेनच्या सहाय्याने विहीर खोदकामाला घरघर लागली आहे.

जिकिरीचे काम आणि धोकादायक तरीही मोबदला कमी:- मजुर राजाभाऊ शेळके

विहिर खोदकाम करताना तळातले काम खुपच जिकिरीचे आणि धोकादायक असुन जीव मुठीत धरून काम करावे लागते.क्रेनच्या सहाय्याने मोठमोठे दगड वर काढताना कामगारांच्या अंगावर पडण्याची भिती असते.त्यामुळे फार लक्ष ठेवून काम करावे लागते.तरीही मेहनतीच्या मानाने मोबदला कमी असल्याचे १२ वर्षांपासून काम करणारे मजुर राजाभाऊ शेळके, बाबासाहेब जोगदंड, सर्जेराव शेळके,भारत शेळके,गणपत शेळके यांनी सांगितले.

## अवैध व चोरटी दारू विक्री

ठाकुर पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष साबळे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, पोलीस उप निरीक्षक श्री.सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/ तुळशिराम जगताप, पोह/ पी.टी.चव्हाण, पोह/विकास राठोड, पोह/राहुल शिंदे, पोना/ बाळु सानप, चालक पोशि/नामदेव उगले यांनी केलेली आहे.

## १३ मे रोजी मतदान करायला

बीड, केज, माजलगाव, आष्टी, परळी, गेवराई या विधानसभा मतदार संघांमध्ये ही सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीला मतदार नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

त्यापुढे म्हणाल्या, बीड लोकसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषद, पोलीस विभागातील सर्वच अधिकारी, कर्मचारी असे जवळपास १५००० विविध शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी दिवस-रात्र निवडणुकीच्या विविध जबाबदारीचे वहन करीत आहेत. ही जबाबदारी मतदार नागरिकांनी मतदान करण्यासाठी पार पाडीत आहेत. मतदारांनी सोमवार दिनांक १३ मे रोजी घराबाहेर पडून मतदान करून मतदानाचा आपला हक्क बजवावा, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

भारतीय राज्यव्यवस्था न्यायपालिका, विधायिका, कार्यपालिका या तीन महत्त्वपूर्ण स्तंभांवर उभी असून कार्यपालिका म्हणून जिल्हा प्रशासन निवडणुकीचे काम चोख पार पाडत आहे. तर संसदेत पाठवण्याची जबाबदारी मतदारांची आहे मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन योग्य उमेदवार निवडून संसदेत पाठवावा आणि लोकशाही बळकट करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. मागील दोन टप्प्यात मतदानाचा टक्का घसरल्याने बीडकरांनी मतदानात सक्रिय सहभागी होऊन बीडची जनता लोकशाही प्रिय आहे हे सिद्ध करून दाखवावे, असेही ते यावेळी म्हणाल्या.

# पंकजाताई हक्काच खंबीर नेतृत्व दिल्लीत पाठवणार, पालवन मराठा बांधवांचा निर्धार ...! कोणत्याही मतदार बांधवांच्या विश्वासाला तडा जाणार नाही - पंकजाताई

बीड प्रतिनिधी

भाजपा महायुतीचे उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी आज सायंकाळी पालवण ता. बीड येथे ग्रामस्थांशी भेट घेऊन थेट संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी विकास कामामुळे कर्तृत्ववान व लोकप्रिय ठरले. शेतकरी, महिला, कामगार यांच्यासाठी विविध हितकारी योजना राबल्यामुळे घराघरात आणि मनामनात नरेंद्र मोदीच नाव पोहचले. पुन्हा एकदा केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन होणारच.दिल्ली सरकार मध्ये जिल्ह्याच्या विकासाची गॅरंटी देणारा लोकप्रतिनिधी असला पाहिजे. जातीयता व भावनेच्या आहारी न जाता विवेक बुद्धीने मतदान करून, पंकजाताईना संसदेत पाठवणार असा निर्धार पावलवण येथील मराठा बांधवांनी व्यक्त केला आहे.



भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पालवण येथे भाजप महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस योगेश क्षीरसागर, नवनाथ शिराळे, बालाजी पवार, माजी जिप उपाध्यक्षा जयश्रीताई मस्के, रावसाहेब तात्या मस्के, हनुमान मस्के, युवराज मस्के, बद्रीनाथ जटाळ, प्रल्हाद चित्रे, अण्णासाहेब मस्के, शिवाजीराव मस्के, अंकुश साबळे, रवींद्र कळसाने , महादेवराव बहिरवाळ यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कोणत्याही मतदार बांधवांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची पूर्ण काळजी मी घेणार असून जिल्ह्याच्या परिपूर्ण विकास वचनबद्ध आहे. खुल्या मनाने मतदान करून मला समर्थन द्या. असे यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. पंकजाताई मुंडे यांच्या बैठकीला ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला असून, आजच्या राजकीय व सामाजिक घडामोडीवर मोकळे पणाने पंकजा ताईची चर्चा झाली. जिल्ह्याच्या विकासासाठी दिल्लीमध्ये हक्काच आणि खंबीर नेतृत्व असले पाहिजे. पंकजाताईच्या माध्यातून केंद्र सरकारमध्ये मंत्रिपद मिळेल आणि पुन्हा एकदा विकास गतिमान होईल, यासाठी पंकजाताईना भरघोस मतदान करणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्टपणे सांगितले.

## शिक्षकांनी समाजशील व्हावे: हेरंब कुलकर्णी सिंदफणा शाळेत लोकनेते सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेचे पहिले पुष्प उत्साहात

माजलगाव प्रतिनिधी

शिक्षकांनी समाजातील प्रश्न समजून त्यावर आपल्याला जमेल त्या पद्धतीने काम करत समाजशील व्हावे, असे मत प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व वक्ते हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल द्वारा सुरू करण्यात आलेल्या महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पामध्ये बोलत होते. शिक्षकांसाठी साने गुरुजी या विषयावर त्यांनी शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी शहरातील ख्यातनाम कवी प्रभाकर साळेगावकर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर गढी येथील शिवशारदा पब्लिक स्कूलचे प्राचार्य कॅप्टन चितृदास पिल्लई व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. सेवा दलाच्या ज्येष्ठ पदाधिकारी ॲड. सुलभा देशमुख देखील यावेळी उपस्थित होत्या.


व्याख्यानमालेची सुरुवात शाळेचे संगीत शिक्षक




चैतन्य जाधव व प्रवीण तिवारी यांनी गायलेल्या खरा तो एकची धर्म या गीताने झाली. साने गुरुजी आज देखील महाराष्ट्राला आकर्षित करणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना लाभलेल्या अल्पायुषात त्यांनी खूप मोठे कार्य केले आहे. गुरुजी हे विद्यार्थ्यांवर प्रचंड प्रेम करणारे व्यक्तिमत्त्व होते, म्हणून सर्व शिक्षकांनी देखील मुलांशी प्रेमाने वागण्याची शिकवण आपण त्यांच्याकडून घेतली पाहिजे, असे ते म्हणाले. व्याख्यानमालेच्या प्रथम पुष्पाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य अन्वर शेख व डॉ. वरूण यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात कवी प्रभाकर साळेगावकर म्हणाले की, साने गुरूजी समजणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षक हा उत्तम साहित्यिक असतो. त्याने समाजाला काहीतरी देणे गरजेचे आहे. साने गुरूजींनी केलेल्या महान कार्यासाठी त्यांना देशाचा सर्वोच्च सन्मान भारत रत्न पुरस्कार द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

## प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विले पार्ले चा जिम्नॅस्ट आध्यान देसाई याची भारतीय संघात निवड

मुंबई : मुंबईचे माजी महापौर माजी आमदार डॉ. रमेश यशवंत प्रभू यांनी १९९७ साली प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुलाची स्थापना केली तेव्हा त्यांच्या मनात एक मोठे स्वप्न होते. त्यांना जागतिक दर्जाच्या आणि सर्वांसाठी खुल्या अशा पायाभूत सुविधा निर्माण करायच्या होत्या. गेल्या काही वर्षांमध्ये, प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाने खेळाडूंसाठी जागतिक दर्जाचे इक्विपमेंटस् प्रदान केली आहे. यातील अनेक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर आपल्या खेळात ठसा उमटवला आहे. संकुलात खालील निरनिराळ्या क्रिडा प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण तज्ज्ञ प्रशिक्षकांडून दिले जात आहे. जलतरण, पिकलबॉल, मल्लखांब, बुद्धिबळ, ज्युडो, जिम्नॅस्टिक्स, कराटे, तायकोंडो, व्यायामशाळा, रोलर स्केटिंग, टेबल टेनिस, झुंबा, रायफल शुटिंग ईत्यादी. प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या ७ हून अधिक खेळाडूंनी विविध खेळांमध्ये सर्वात प्रतिष्ठित शिवछत्रपती पुरस्कार जिंकला आहे. मल्लखांब खेळातील अतुलनीय




कामगिरीबद्दल श्री गणेश देवरूखकर यांना यावर्षी द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अगदी अलीकडेच, जिम्नॅस्टिक्स ॲथलीट आध्यान देसाईची आगामी ज्युनियर एशियन ट्रॅम्पोलिन जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिप २०२४ साठी हाँगकाँग, चीन येथे टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा मे महिन्यात होणार असून १० ते १२ मे २०२४ या कालावधीत होणार आहे. आध्यान हा माजी अंडर-१२ राष्ट्रीय चॅम्पियन देखील आहे आणि त्याने कोलकाता येथे नुकत्याच संपलेल्या सब ज्युनियर नॅशनल स्पर्धेत अनेक पदकेही जिंकली आहेत. हरियाणा येथील खेलो इंडियन युथ गेम्स २०२२ मध्येही त्याने भाग घेतला होता आणि सरकारी मंजूर योजनेअंतर्गत तो एक खेलो इंडिया ॲथलीट आहे. आध्यान गेल्या १० वर्षांपासून प्रबोधकार ठाकरे क्रीडा संकुल मध्ये सराव करत आहे. त्यांचे प्रशिक्षक श्री शुभम गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अध्यक्ष श्री. अरविंद रमेश प्रभू आणि सचिव श्री मोहन अ. राणे यांच्या पाठिंब्याने ही अतुलनीय कामगिरी केली आहे. अध्यक्ष श्री. अरविंद रमेश प्रभू आणि सचिव मोहन अ. राणे यांनी ही बातमी मिळाल्याने आनंद व्यक्त केला आणि आशियाई स्पर्धेसाठी आध्यानला शुभेच्छा दिल्या.

## बहुजनांच्या कल्याणासाठी बजरंग सोनवणेंच्या पाठीशी उभे राहावे - रमेशतात्या गालफाडे; बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ जिल्ह्यात मतदारांच्या भेटीगाठी सुरू

बीड ; महागाईने सर्वसामान्यांचे कंबडे मोडले आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. हाताला काम नसल्याने तरुण बेकार बनले असून महिलांचे प्रश्न सुटलेले नाहीत. म्हणून बहुजन समाजाचा विकास व कल्याण करण्यासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना संसदेत पाठवा. असे आवाहन बहुजन विकास परिषदेचे रमेशतात्या गालफाडे यांनी केले.

बीड लोकसभेचे इंडिया उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेशतात्या गालफाडे यांनी जिल्ह्यात गावभेटी सुरू केल्या आहेत. यावेळी मतदारांशी संवाद साधताना रमेशतात्या गालफाडे हे बोलत होते.

यावेळी रमेशतात्या गालफाडे म्हणाले की, मूलभूत प्रश्न सुटले म्हणजे विकास नसून सामाजिक, आर्थिक, समानता हाच मुळ विकास आहे. मात्र यावर कोणी बोलत नसून महापुरुषांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी, मानसन्मान, स्वाभिमानासाठी छेडलेल्या आंदोलनाची आज तरी पुर्ती झाली आहे का ? हे आज निवडणुकीच्या निमित्ताने पाहणे आवश्यक आहे. मागील दोन वर्षात राजकारणाची पातळी घसरली असून सत्ताधारी पक्षाकडून स्वायत्त संस्थांचा गैरवापर होत आहे. महागाई, बेरोजगारी, शेतकरी, विद्यार्थी, महिलांचे निर्माण प्रश्न गंभीर बनले असून संपूर्ण देशात अराजकता निर्माण झाली आहे. संविधान व लोकशाही संपुष्टात येवून देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. म्हणून बहुजन समाजाला व देशाची स्थिती सुधारण्यासाठी आधी लोकशाही व संविधानाचे संरक्षण करण्यासाठी समतावादी व पुरोगामी विचारसरणीच्या लोकांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवून एकत्र येत इंडिया आघाडीच्या पाठीशी उभे राहणे महत्वाचे आहे. म्हणून बहुजन समाजाच्या कल्याणासाठी बीड लोकसभेचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांना निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

## दहिफळ मध्ये जयभिम महोत्सव होणार मोठ्या उत्साहात साजरी जयंतीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अध्यक्ष. अजय जाधव

बीड प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीड तालुक्यातील दहिफळ येथे जयभिम महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची सुरुवात सोमवार (दि.२९) एप्रिल रोजी जयभिम महोत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन भिमरत्न ग्रुप च्या वतीने करण्यात आले आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारत देशासाह १५२ देशात साजरी होते.त्या अनुषंगाने दहिफळ येथे जयभिम महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता पंचशील ध्वजारोहण, सकाळी १० वाजता अभिवादन, सायंकाळी ४ वाजता मिरवणूक, रात्री ६ वाजता भोजनदान रात्री ८ वाजता मिरवणूक निघणार आहे. तरी चिंचोली माळी, दहिफळ नाळवंडी, सह परिसरातील सर्व भीमसैनिकांनी जयंतीस मोठ्या संख्येने उपस्थित राहवे .

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे केजमध्ये झंझावाती दौरा

केज ; वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे बीड लोकसभेसाठी सध्या ग्रामीण भागासह, शहरात सर्वत्र जिल्हा पिंजून काढत आहेत अशातच आज त्यांचा झंझावाती दौरा केज येथे असतांना केजमध्ये त्यांचा तेथील पदाधिकारी यांनी सत्कार केला व वंचित बहुजन आघाडीला केजमधून आघाडी मिळवून देवू असे आश्वासित केले.




सत्काराला उत्तर देतांना अशोक हिंगे म्हणाले की, देशात आणि राज्यात सध्या सत्ताबदलाचे वातावरण असून शेतकर्यांचे प्रश्न, बीडचा जिव्हाळ्याचा रेल्वे प्रश्न, महागाईचा प्रश्न, बीडच्या कित्येक दिवसांपासून एमआयडीसीचा प्रश्न यामुळे वाढती बेरोजगारी आणि युवकांचे प्रश्न यासाठी उपेक्षित तरुणांनी देखील वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा दिला असून सर्वांनी सहकार्य करा आपण जिल्ह्यातील हे सर्व प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन त्यांनी दिले. अशोक हिंगे हे केजकडे जयंतीसाठी जात असताना मस्साजोग येथे त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी डॉ. रोडे, सुभाष आबा सोनवणे, जि.महासचिव ज्ञानेश्वर कवठेकर, अजय सरवदे, ता.अध्यक्ष बाबासाहेब मस्के, युवक जिल्हासचिव लक्ष्मण ओव्हाळ, बापू गायकवाड, शाखा अध्यक्ष मनोज सोनवणे, दीपक वाघमारे आदी उपस्थित होते.

## लोकसभा २०२४; भाजपाच्या पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी भाजपा वैद्यकीय आघाडीने घेतला पुढाकार!

बीड प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार आदरणीय लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ भाजपा वैद्यकीय महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष डॉक्टर चंचल साबळे व डॉक्टर अभय वनवे यांनी आज बीड शहरातील डॉक्टरांच्या व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांच्या हॉस्पिटलमध्ये व क्लिनिक मध्ये जाऊन गाठीभेटी घेतल्या. डॉ. चंचल साबळे यांनी लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना बीड जिल्ह्याचा चेहरा व मोहरा बदलण्यासाठी भरघोस मताने निवडून देण्याचे जिल्हावासीयांना आवाहन केले. शहरातील डॉक्टरांना प्रदेश उपाध्यक्ष भाजपा वैद्यकीय आघाडी डॉक्टर अभय वनवे यांनी जिल्ह्यातील सिंचन व उद्योगधंदे तसेच रेल्वेचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी पंकजाताई यांना आपले मत देऊन विजयी करावे असे आवाहन केले. बीड शहरातील डॉरवींद्र घुमरे, डॉ अनिल बारकुल, डॉसंतोष शिंदे , डॉक्टर अमित काळे, डॉ आशिष गर्जे, डॉ.सुरेश मुंडे, डॉ.सुभाष जोशी, डॉक्टर विवेक पालवणकर, डॉ.दीपक आखाडे यांच्या हॉस्पिटल ला भेटी दिल्या.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री राजेंद्र जी मस्के यांनी जिल्हा प्रचार कार्यालय मध्ये नाशिक येथून खास पंकजाताईसाहेब गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारासाठी डॉक्टर चंचल साबळे या आल्याबद्दल त्यांचा सत्कार करून आपण प्रचारासाठी वेळ देत असल्याबद्दल आभार व्यक्त केले

## जातीपातीच्या राजकारणातून बाहेर येऊन विचारपूर्वक मतदान करा-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड प्रतिनिधी

भविष्यात आपल्या मतदार संघातील कामे मार्गी लावण्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड तालुक्यातील नागापूर (खुर्द) येथे शनिवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.योगेश क्षीरसागर बोलताना म्हणाले की, देशाच्या सर्वोच्च सभागृहात पंकजाताई मुंडे यांना निवडून पाठवायचे आहे. जाती पाती पेक्षा समाज जोडण्याचं काम करायचं आहे. आम्ही कुठल्याही समाजाची जात धर्म बघून कामे केली नाहीत. आम्ही जातीच्या आधारावर मत देखील मागत नाहीत. तर आम्ही विकासावर मतदान मागत आलो आहोत. भविष्यात जर आपल्या मतदार संघातील विकासकामे मार्गी लावायची असतील तर पंकजाताई यांना संसदेत पाठवावे



लागेल.पंकजाताई राज्याच्या मंत्री असताना विविध विकासकामे त्यांनी केली आहेत. त्यांच्याच माध्यमांतून आपली उर्वरित कामे पूर्ण करून घेण्याची जबाबदारी घेणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले. जातीपातीच्या राजकारणातून बाहेर येऊन मतदान करा. आपल्या मतांच दान विचार करूनच द्या. पुढील पिढीच भविष्य कोण घडवू शकत याचा विचार नक्की करा. तसेच पंकजाताई मुंडे यांना मतदान करून आपला हक्क पार पाडाल अशी अपेक्षा व्यक्त केली. या बैठकीत गावकऱ्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आमचा विचार डॉ.योगेश क्षीरसागर आणि डॉ.सारिकाताई क्षीरसागर आहेत. ते सांगतील त्या उमेदवाराला आम्ही मतदान करू. आम्ही जात पात मानत नाहीत. त्यामुळे पंकजाताईना केवळ खासदार म्हणून निवडून द्यायचं नाही तर देशाच्या मंत्री म्हणून संसदेत पाठवायचे आहे असे सांगितले. याप्रसंगी मा.सरपंच जालिंदर साळुंके, चेअरमन विष्णू साळुंके, मा.उपसरपंच खाजामिया पठाण, वसंत लव्हाळे, मनसेचे रामेश्वर आबा साळुंके, हनुमान साळुंके, धर्मा साळुंके, रा.काँ.चे सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष बबन वाघमारे, मिलिंद ठोकळ, बाळू आमटे, दत्ता साळुंके, समाधान घोडके, शंकर लव्हाळे, प्रकाश जवंजाळ, सतीश साळुंके यांच्यासह नागापुर खुर्दचे सर्व नागरिक आणि महिला भगिनी उपस्थित होते.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे






सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
रविवार दि.२८ एप्रिल २०२४ (पान ४)







# ही लढाई आपल्याला जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायचीयं

## भाशिप्र संस्थेच्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडेंना विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार; जातीपातीच्या भिंती तोडून प्रज्ञावंतांनी मतदार जागृतीसाठी योगदान द्यावे

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि मुंडे परिवाराचे वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध आहेत. तुम्ही सर्व सुशिक्षित आणि प्रज्ञावंत आहात. प्रज्ञावंत मतदार म्हणून तुम्ही नक्कीच जिल्ह्याच्या विकासाला योगदान देण्यासाठी तुमचे अमूल्य मत मला द्याल ही खात्री आहे, मात्र तुमच्यासह आपल्यासाठी नकारात्मक असलेली वीस मते तरी प्रत्येकाने आपल्या बाजूने मिळवण्यासाठी भाजपची विचारधारा अन् देश विकासाचे धोरण मतदारांपर्यंत पोहचवावे असे आवाहन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केलं.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या आशीर्वाद मंगल कार्यालयात झालेल्या मतदार जागृती मेळाव्यात पंकजाताई मुंडे बोलत होत्या. संस्थेचे अध्यक्ष डॉ.हेमंत वैद्य, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रवक्ते राम कुलकर्णी, उमेश जगताप,चंद्रकांत मुळे आदींसह केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, संघ विचारसरणीत मोठे झालेल्या गोपीनाथराव मुंडे यांची मी कन्या आहे. त्यामुळे शिस्त आणि माझे कर्तव्य मला माहित आहे. या निवडणूकीत जातीपातीच्या भिंती तोडण्यासाठी प्रज्ञावंतांनी योगदान द्यावे. भाशिप्र संस्थेच्या सर्व प्रज्ञावंतांनी आपल्याविरुद्ध असलेली नकारात्मक मते सकारात्मक करण्यासाठी काम करावे. बीड जिल्ह्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मी मते मागत आहे. त्यात तुम्ही तुमचे सत्पात्री दान टाकावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. आपण कोणीही जातीवादाला थारा देत नाहीत पण निवडणूक आली की, मुद्दाम विरोधकांकडून जात पुढे आणली जाते. यातून जोडलेली माणसं




बाजूला करण्याच काम केलं जातं. मात्र ही लढाई आपल्याला बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जिंकायची आहे. पुन्हा एकदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना विराजमान करण्यासाठी आपण सर्वांनी या निवडणूकीत भाजप-महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे. राजकारणात मुंडे परिवाराने कधीही जात-धर्माचा भेदभाव केला नाही याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

मुंडे साहेबांचे संस्थेसाठी भरीव योगदान; पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देऊ

प्रारंभी प्रास्ताविक भाशिप्रचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे यांनी केले.दिवंगत गोपीनाथ मुंडे साहेबांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेसाठी भरीव काम केले आहे हे आम्ही कधी विसरणार नाही.भा.शि.प्र.संस्थेच्या प्रत्येक संस्कार केंद्रातून पंकजाताई मुंडे यांना अधिकाधिक मतदान मिळवण्यासाठी आम्ही सर्व जण सामूहिक योगदान देऊ असं मुळे म्हणाले.याप्रसंगी राम कुलकर्णी म्हणाले, माझी माणसं, माझा जिल्हा या भावनेने पंकजाताई मुंडे काम करतात.भा.शि.प्र ही संस्था आणि मुंडे परिवाराचा खूप वर्षांचा ऋणानुबंध आहे. शिक्षण क्षेत्रात भरीव काम आपल्या संस्थेला मुंडे साहेबांच्या आणि नंतर पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना करता आले आहे त्यामुळे या निवडणुकीत पंकजाताई यांना प्रचंड मतांनी आपल्याला निवडून द्यायचे आहे असा संकल्प आम्ही सर्वांनी केला आहे पंकजाताई यांचा विजय निश्चित आहे फक्त त्या किती लाख मतांनी निवडून येतील याची आम्हाला प्रतीक्षा आहे असे ते म्हणाले. याप्रसंगी हेमंत वैद्य म्हणाले, भा. शि. प्र. संस्थेच्या सर्व कर्मचार्यांनी या निवडणुकीत मतदार जागृतीचे काम करावे. देशाला पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच सरकार सत्तेत आणण्यासाठी बीड लोकसभा मतदार संघात पंकजाताई मुंडे यांना निवडून देण्यासाठी सर्व प्रज्ञावंतांनी योगदान देवून मतदान जागृती करावी. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था कायम पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, ताईंचा विजय निश्चित आहे असा विश्वास हेमंत वैद्य यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन उमेश जगताप यांनी केले. ▶▶ पान २ वर...



बीड : भाजपच्या राष्ट्रीय सचिव व बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बबनराव गवते यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना श्री. गवते, काशिबाई गवते, पंचायत समितीच्या सभापती सारिका गवते, बळीराम गवते, अनिता गवते - शेळके. शेळके शिवराज




शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख मा.किशोरजी पोतदार साहेबयांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात जिव्हाळा बेघर केंद्रयेथील निराधारान समवेत वाढदिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमास जिव्हाळा बेघर केंद्र व बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते,शहर प्रमुख शेख निजाम,रतन गुजर,शिवाजी तिपाले, विनोद गुंड, अजय गायकवाड यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# बजरंग बप्पा निवडून यावे म्हणून गाडे ओढणारे सिद्धेश्वर हिंगे

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूकीत आपला उमेदवार जिंकण्यासाठी अनेकजण वेगवेगळ्या शर्यती लावतात आणि नवस देखील करतात. असाच गेवराई तालुक्यातील एका तरुणाने राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे विक्रमी मतांनी निवडून यावेत आणि त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा दारुण पराभव व्हावा म्हणून गाडे



ओढण्याचा नवस केला होता तो त्याने हनुमान जयंती दिनी गाडे ओढून पूर्ण केला.

या बाबतची माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील रानमळा हे छोटे गाव आहे. या गावातील मराठा आंदोलन आणि मराठा आरक्षणासाठी ▶▶ पान २ वर...

# डॉ.आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत अशोक हिंगे यांनी साधला मतदारांशी संवाद

**अशोक हिंगे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचा मतदारांचा निर्धार**

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी काल केज तालुक्यातील विविध ठिकाणच्या आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत मतदारांशी संवाद साधला यावेळी मतदारांनी हिंगे यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवण्याचा निर्धार व्यक्त केला.



वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या नियोजनबद्ध प्रचाराने महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवाराना धडकी भरली असून अशोक हिंगे पाटील यांना प्रत्येक गावातून जातीभेद विसरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार हे जातीपातीचे राजकारण करत आहेत हे सुज्ञ मतदारांनी ओळखले आणि पुरोगामी महाराष्ट्रात जातीच्या राजकारणला थारा नाही म्हणून महायुती महाविकास आघाडीच्या उमेदवाराला घरी बसऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवायचेच असा निर्धार प्रत्येक गाव खेड्यातील मतदार बोलून दाखवत आहे काल अशोक हिंगे पाटील यांनी आडस सोनवळा, मुलेगाव भावठाणा, केज, मसाजोग, गांजी आदी गावच्या आंबेडकर ▶▶ पान २ वर...

# बीड मतदारसंघातील बुथप्रमुखांना पंकजाताई मुंडेंनी दिला कानमंत्र

## घरोघरी जावून मतदारांशी संवाद साधा, अधिकाधिक मतदान मिळवा

**बुथप्रमुखांनी दिला ऐतिहासिक मताधिक्य मिळवून देण्याचा शब्द**

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक आपल्या जिल्ह्याच्या पुढील भवितव्याची नांदी ठरणारी आहे. त्यामुळे गावा-गावात अन् घरा-घरात जावून मतदारांशी संवाद साधा. देशपातळीवर सक्षम नेतृत्व आणि विकासाची गंगा आणण्यासाठी अधिकाधिक मतदान मिळवा. आज, आतापासून प्रचार कालावधी संपेपर्यंत प्रत्येकाच्या घरी जा व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मतं मागा, असे आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

बीड मतदार संघातील बुथप्रमुखांचा



मेळावा आज आशीर्वाद लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडला, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह बीड मतदार संघातील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

मी कधीच कोण्या व्यक्तीच्या विरोधात नसते तर मी भूमिकेच्या विरोधात असते. ही निवडणूक जिंकण्यासाठी बुथप्रमुखांनी आपापल्या गावांतील घरोघरी जावून जिल्ह्याच्या विकासासाठी मतदान मागावे, प्रेमानं जग जिंकता येतं. त्यामुळे प्रत्येकांशी संवाद अन् संपर्क कायम ठेवा. भाजपची विकासाची गाथा मतदारांपर्यंत पोहचवा असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. मी जिल्हा पिंजून काढत आहे. बैठका, मेळावे, गाठीभेटी, पदयात्रेतून अधिकाधिक मतदारांपुढे जावून मते मागत आहे, त्यामुळे मागे हटू नका, सक्रीयतेने व्यापक मताधिक्यासाठी बुथप्रमुखांनी काम करावं. आपला बुथ प्रत्येकाने सांभाळावा असेही त्या म्हणाल्या.

बुध्दीभेदाच्या प्रचाराला बळी पडू नका मुंडे परिवाराने ▶▶ पान २ वर...

# मनुष्याने अहंकार नष्ट करावा म्हणजे सद्गुणी विचार अधिक बलवान होतात सहदेव महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री पंढरीस परमात्म्याच्या असिम कृपेने श्री बंकटस्वामी महाराज यांच्या सकल साधुसंताच्या आशीर्वादाने व श्री. ह. भ. प डॉ. महंत सहदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य श्री राधाकृष्ण मूर्तीप्राण प्रतिष्ठा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह राधाकृष्ण आश्रम मांडवजाळी येथे सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सात दिवसीय संगीतमय श्रीमद्? भागवत कथेचे आयोजन





मंगळवार २३ एप्रिल ते मंगळवार ३० एप्रिल पर्यंत करण्यात आले आहे. दि. २६ एप्रिल रोजी राधाकृष्ण मूर्ती प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आणि मुर्ती प्राण प्रतिष्ठा निमित्ताने ह.भ.प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे किर्तन संपन्न झाले. श्री. ह. भ. प डॉ. सहदेव महाराज शास्त्री यांची भव्य दिव्य अशी श्रीमद्? भागवत कथा सुरू आहे या भगवत कथेच्या पाचव्या दिवशी महाराजांनी आपल्या वाणीतून भाविकांना संदेश दिला. ▶▶ पान २ वर...

# बीडमध्ये टपाली मतदान दि. १० ते १२ मे ला होणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदार संघांतर्गत २२८ गेवराई, २२९ माजलगाव, २३० बीड, २३१ आष्टी, २३२ केज व २३३ परळी वैद्यनाथ या विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी, व्हिडिओग्राफर, वाहन चालक इत्यादी मतदारांचे फॉर्म नं. १२ मंजूर असलेल्या टपाली मतपत्रिकाद्वारे मतदान करून घेण्यासाठी पथकांची नियुक्ती




करण्यात आली आहे. सुविधा मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. सुविधा मतदान केंद्रामध्ये मतदान करण्यासाठी वेळापत्रक ठरविण्यात आले आहे.

वेळापत्रक

मतदान ▶▶ पान २ वर...

# राज्यात सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचा अध्यक्ष हा बंजारा समाजाचा असेल - बजरंग सोनवणे

**बीड / गेवराई । प्रतिनिधी**

आम्ही बंजारा समाजाच्या सदैव पाठीशी आहोत. राज्यात इंडियाआघाडीचे सरकार आल्यास ऊसतोड महामंडळाचे अध्यक्षपद देखील बंजारा समाजाच्या व्यक्तीला देवू. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीध्ये बंजारा समाजाला प्रतिनिधित्व देवून त्यांचा सन्मान राखला जाईल. असे आश्वासन बजरंग सोनवणे यांनी दिले.

गेवराई शहरातील बेदरे लॉन्स येथे बंजारा समाजाचा राष्ट्रवादी काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे उमेदवार



**गेवराईच्या मेळाव्यात बंजारा समाजाचा बजरंग सोनवणे यांना पाठिंबा**

बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी महानायक ग्रुपच्या वतीने संस्थापक अध्यक्ष भगवान राठोड यांनी बंजारा समाजाच्या वतीने मेळावा आयोजित करून शक्ती प्रदर्शन केले. यावेळी उमेदवार बजरंग सोनवणे हे बोलत होते. मेळाव्यास युवा राष्ट्रवादी ▶▶ पान २ वर...

# जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी बीड आणि गेवराई विधानसभा मतदार संघांची केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी निवडणूकीच्या धर्तीवर आज २३० बीड आणि २२८ गेवराई विधानसभा मतदार संघांची पाहणी केली. जिल्हा परिषद शाळा गेवराई मतदान केंद्र येथील मुलभुत सुविधा व्यवस्थेची पाहणी केली. याठिकाणी मतदारांसाठी मतदाना नंतर असलेला सेल्फी पॉईंट उभारले आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांना त्यांच्या प्रचार प्रसाराकरीता लागणाऱ्या पूर्वपरवानगी अनुमति देण्यासाठी निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही सुरू आहे का याबाबतचा आढावा नगरपरिषद कार्यालय गेवराई येथे जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी घेतला.

यासह या मतदार संघात ८५ वर्षाच्या वरचे तसेच दिव्यांग मतदारांसाठी आयोगाने निर्धारित केलेल्या नियमानुसार कामे करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. बीड विधानसभा मतदार संघात आयोगाकडून आलेल्या साहित्य स्वीकृती व वितरण कक्षाला भेट देऊन पाहणी केली.



# राष्ट्रीय बंजारा परिषदेचा पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा



**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा मतदार संघात महायुतीची ताकद वाढली असून पंकजाताईंना मोठे मताधिक्य मिळेल यात शंका नाही. जिल्हयातील सर्व बंजारा समाज मताधिक्य देण्यासाठी एकजुटीने कामाला लागले आहेत असे परिषदेने यावेळी म्हटले. याप्रसंगी राष्ट्रीय बंजारा परिषदेचे प्रदेशाध्यक्ष जयकुमार राठोड यांच्यासह जिल्हाध्यक्ष ▶▶ पान २ वर...

# आरोग्यदूतच्या आरोग्य संवाद यात्रेने विदर्भ-मराठवाडा पिंजून काढला

**पंकजाताई मुंडे यांनी केले अंबाजोगाईत स्वागत**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रव्यापी आरोग्यदूत फाऊंडेशनने काढलेल्या आरोग्य संवाद यात्रेने संपूर्ण विदर्भ आणि मराठवाडा अक्षरशः पिंजून काढला. या यात्रेचा गडचिरोली ते गडहिंग्लज असा प्रवास सुरू आहे. अंबाजोगाई येथे भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आरोग्य संवाद यात्रेचे स्वागत केले.

राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, लोकप्रिय खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे यांच्या आदेशानुसार आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेशजी चिवटे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र व्यापी आरोग्य संवाद सुरू झालेली आहे. गेल्या दि.९ एप्रिल २०२४ रोजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या हस्ते आरोग्य संवाद यात्रेचा शुभारंभ करण्यात आला.




पहिल्या टप्प्यात संपूर्ण विदर्भ, मराठवाडा अणि पश्चिम महाराष्ट्र असा प्रवास सुरू आहे, अशी माहिती शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख राम राऊत यांनी दिली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत सुरू असलेले आरोग्यविषयक उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर व्यापक जनजागृती व्हावी, ▶▶ पान २ वर...